# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०६/१०/२०१६

**१) अवैधरित्या १ ब्रास रेतीची करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/१०/२०१६ रोजी १०.०० वा. दर. पोलीस स्टेशन ला फोन वरून खबर मिळाल्याने फिर्यादी हा स्टॉपसह दाभा गावा जवळ गेला असता १ निळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ नंतरचा नंबर खोडलेला व निळया रंगाची ट्रॉली बिना नंबरची ज्यात अवैद्यरीत्या १ ब्रास रेती कि. २,०००/–रू. ची भरून चोरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खोकले रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९,भादंवि. सहकलम २०७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) ट्रक चालकांच्या लापरवाहीने, एक जखमी . :–**

दिनांक ०५/१०/२०१६ रोजी १२.१५ वा. दर. यातील फिर्यादी रामनाथ जयपाल चौधरी वय ४५ वर्ष, रा. मिरकापुर (बुडरु) पोस्ट. तिरोडी जि. बालाघाट हा जखमी आपल्या मोटार सायकल क्र. एमपी ५० एमजे १२७३ ने तुमसर ते बोपेश्वर लाखेगाव येथे जात असता मागेहुन येणा–या अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक हयगयीने, लापरवाहीने चालवुन मोटार सायकलला कट मारल्याने जखमी हा मोटार सायकल सह खाली पडुन त्याचे उजवे पायाचे पंज्या वरुन ट्रक चा समोरील चाक गेल्याने पाय फॅक्चर होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०५/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर येथील कलम ८५ (१) अन्वये म.दा.का अन्वय गुन्हा नोंद करुन आरोपी अटक करण्यात आला.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

६/१०/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

# प्रेस नोट

## फॉरेन्सीक मोबाईल व्हॅनचे

## विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र नागपुर यांचे हस्ते उद्घाटन

जा. क्र. ६४४/माहीती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :- ०५/१०/२०१६

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र नागपुर यांचे भंडारा जिल्हा पोलीस दलाचे सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाचे वार्षीक निरीक्षण सुरु आहे. याच कालावधीत महाराष्ट्र शासनाकडुन महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांना सुसज्ज अशा फॉरेन्सीक मोबाईल व्हॅन पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी एक फॉरेन्सीक मोबाईल व्हॅन भंडारा जिल्हा पोलीस दलाचे आस्थापणेवर पुरविण्यात आलेली आहे. वार्षीक निरीक्षणाचे औचित्य साधुन दिनांक ०५/१०/२०१६ रोजी फॉरेन्सीक मोबाईल व्हॅनचे उद्घाटन मा. रविंद्र कदम साहेब, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र, नागपुर यांचे हस्ते पोलीस मुख्यालय भंडारा येथे करण्यात आले.

पोलीस दलाला पुरविण्यात आलेल्या फॉरेन्सीक मोबाईल व्हॅन मुळे पोलीस दलाला गुन्हयाचे घटनास्थळावरील **Scientific** पुरावे गोळा करण्याकरीता फार मोठी मदत होणार असुन पोलीस तपासात गती मिळणार आहे. घटनास्थळावर मिळुन आलेले पुरावे तात्काळ तपासणी करीता वैज्ञानिक प्रयोगशाळेत दाखल करणे सोयीस्कर होणार आहे.

पुरविण्यात आलेली फॉरेन्सीक मोबाईल व्हॅन अत्त्याधुनिक उपकरणांनी सज्ज असुन त्यामधे जनरल क्राईम सीन, तपासणी किट, ब्लड डिटेक्शन किट, सीमेन डिटेक्शन किट, बुलेट होल टेस्टींग किट, फिंगर प्रिंट डेव्हलपर किट, डि. एन. ए. सॅम्पल पुरावा पॅकींग आणि संकलन किट, क्राईम सिन किट, फॉरेंसिक लाईट, एक्सप्लोझीव्ह डिटेक्शन किट, नारकोटीग डिटेक्शन किट अशा सुविधा आहेत.

सदर उदघाटन सोहळा श्रीमती विनीता साहू, पोलीस अधीक्षक, श्री. बी. आर. गाडे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह), उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय जोगदंड, श्री. विक्रम साळी, मोहनदास संखे, स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत कोलवाडकर, पोलीस निरीक्षक श्री. जयवंत चव्हाण, गोकुळ राऊत, चंद्रशेखर चकाटे, सपोनि श्री. राहांगडाले, राखीव पोउपनि श्री. प्रधान यांचे उपस्थित पार पडला.

प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह)
भंडारा करीता

**प्रति,**

जिल्हा माहीती अधिकारी, भंडारा

/- वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत संगणक-** कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता